दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २२७ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.१२ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## दोन बसमध्ये चिरडून १७ वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू

**दै.रायगड नगरी । मुंबई**

वरळी गाव बस आगारामध्ये दोन बेस्टच्या बसमध्ये चिरडून १७ वर्षीय मुलीचा मंगळवारी दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आगारामध्ये बस नेत असताना चढणावरून बस खाली उतरल्यामुळे ही मुलगी दोन बसच्यामध्ये चिरडली गेली आणि रक्तबंबाळ झाली. प्रीती कोरी असे मृत मुलीचे नाव आहे. याप्रकरणी एका बेस्टच्या बस चालकाला दादर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. गौतम सिद्धार्थ भालेराव असं आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरोधात निष्काळजीपणे गाडी चालवल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रीती कोरी ही मुलगी वरळी कोळीवाड्यातील रहिवासी असून मैत्रीणीसोबत ट्युशनला गेली होती. त्यावेळी तिची मैत्रीण मागे राहिली आणि मुलगी फोनवर बोलत पुढे आली होती. त्याचवेळी आगारामध्ये एक बेस्टची बस आत जात होती. तर दुसरी बस मागे उभी होती. अचानक पुढील बस चढणावरून मागेच्या बाजूने खाली उतरल्यामुळे दोन बसमध्ये ही मुलगी चिरडली गेली.

# रायगड : एसटीच्या संपकरी २२ कर्मचाऱ्यांचे निलंबन



**दै.रायगड नगरी । पेण**

एसटी महामंडळाचे शासनात विलीनीकरण करण्याच्या मागणीसाठी सोमवार पासून सुरु असलेल्या एसटी कर्मचाऱ्यांच्या संपा विरोधात एसटी प्रशासन देखील आक्रमक झाले आहे. संपात सामील झालेल्या रायगड जिल्ह्यातील १९ कर्मचाऱ्यांना बुधवारी निलंबित केले असताना आज गुरुवारी देखील २२ संपकरी कामगारांना एसटी प्रशासनाने निलंबित केले आहे.

एसटी महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याच्या मागणीसाठी सोमवार पासून रायगडातील आठ ही आगारातील कर्मचारी आज सलग चौथ्या दिवशी ही संपावर ठाम राहिले आहेत.

या संपकरी कामगारां बाबत आक्रमक झालेल्या एसटी प्रशासनाने बुधवारी रायगड विभागातील १९ कर्मचाऱ्यांना निलंबित केले असताना आज देखील २२ कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याने एकूण निलंबित केलेल्या एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ४१ झाली आहे.


यावेळी पेण तालुका भारतीय जनता पार्टी कडून उप जिल्हाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली एसटीच्या संपकऱ्यांना जाहीर पाठिंबा देण्यात आला.

## मुरुड खोरा बंदरात दरड कोसळली ; सुदैवाने अनर्थ टळला

### डोंगराला दरड सुरक्षा जाळी बसविण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

प्रसिद्ध मुरुड खोराबंदरत आज सकाळी टोपी विक्रेत्याच्या स्टॉलवर भलेमोठे दगड कोसळले सुदैवाने कोणतीही जीविहानी झाली नाही. होता होता मोठा अनर्थ टळला आहे. याकडे बंदर खात्याने लक्ष देऊन या परिसरातील डोंगराला सुरक्षा जाळी बसविण्याची गरज आहे. अशी मागणी पर्यटक व स्थानिकाकडून होत आहे.



जगप्रसिद्ध मुरुड जाजिरा जलदुर्ग पाहण्यासाठी जगभरातून असंख्य पर्यटक मुरुड खोरां बंदरात येत असतात. सद्या दिवाळी सुट्टीपासून मुरुड कडे पर्यटकांचा ओघ मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कोरोना काळात लॉकडाऊन मुळे मुरुड मधील पर्यटन व्यवसाय बंद होते हे व्यवसाय दीड वर्षानंतर सुरू झाले. लॉकडाऊन पासून घरात बसून राहिलेल्या पर्यटकांनी पुन्हा पर्यटन क्षेत्र सुरू होताच पर्यटनाला मोठ्या प्रमाणात सुरावात केली आहे.

खोरा बंदरात पर्यटन व्यवसाय करणारे तसेच येणारे पर्यटक व त्यांची वाहने यांच्या सूरक्षेततेसाठी या बंदरातील डोंगराला दरड सुरक्षा जाळी बसविण्याची गरज आहे. या पावसाळ्यात व वादळात खोरे बंदरात दरड कोसळली होती. व सतत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे या डोंगराला मोठ्या प्रमाणात नुकसान होऊन डोंगरावरील मोठमोठे दगड सैल झाले आहेत. त्यामुळे आज झालेल्या अपघाताची पुनरावृत्ती न होण्यासाठी बंदर खात्याने दरड सुरक्षा जाळी बसवावी अशी मागणी पर्यटक व स्थानिकाकडून होत आहे.

## विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी घेतली एस.टी.कर्मचाऱ्यांची भेट



एस.टी. कामगारांवर अन्याय होणार नाही व कामगारांच्या चेहऱ्यावर समाधान दिसेल असा सन्मानजनक तोडगा राज्य सरकारने काढणे गरजेचे आहे. यावेळी पनवेल महापालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी एस टी कर्मचाऱ्यांची भेट घेतली.

## संक्षिप्त...

### स्वातंत्र्यावर बोलण्याची कंगनाची औकात नाही : राजू शेट्टी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

देशाला १९४७ साली भीक मिळाली होती खरं स्वातंत्र्य तर २०१४ साली मिळालं असं वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या पद्म पुरस्कार विजेत्या अभिनेत्री कंगना रणौतवर आता जोरदार टीका केली जात आहे. स्वाभीमान शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनीही कंगनाच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. स्वातंत्र्यावर बोलण्याची कंगनाची औकात नाही, अशी रोखठोक टीका राजू शेट्टी यांनी केली आहे.

व्यसनाधीन झालेल्या नटनट्यांनी काहीतरी वक्तव्य करायचं आणि माध्यमांनी त्याला प्रसिद्धी द्यायची हे आपलं दुर्दैव आहे. स्वातंत्र्यासारख्या पवित्र गोष्टीबद्दल बोलण्याची आपली औकात आहे का हे आधी कंगनानं बघावं मग बोलावं. कारण देशात भगतसिंग यांच्यापासून ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्यापर्यंत अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली आहे. महात्मा गांधी यांनी संपूर्ण देशाला स्वातंत्र्याच्या मुद्द्यावर एकत्र केला होता. या गोष्टीला तर कुणीतरी नटी भीक म्हणत असेल तर खरंतर अशा बातम्या दाखवणंच चुकीचं आहे. हा स्वातंत्र्याचा नव्हे, देशाचा अपमान आहे, असा संताप राजू शेट्टी यांनी व्यक्त केला. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळाले ते भीक होती, देशाला खरे स्वातंत्र्य २०१४ मध्येच मिळाले, असे कंगनाने एका मुलाखतीदरम्यान सांगितले. यानंतर कंगनावर टीकेची झोड उठत आहे. यातच आता कंगना रणौतचा पद्मश्री पुरस्कार परत घेण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. राष्ट्रवादीसह शिवसेनेनेही अशीच मागणी केली आहे. कला क्षेत्रात केलेल्या कामगिरीमुळे ८ नोव्हेंबर २०२१ रोजी कंगना राणावत यांचा आपल्या हस्ते पद्मश्री पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कला क्षेत्र वगळता कंगना रणौत या प्रत्येक क्षेत्रात नको त्या ठिकाणी आपले नाक खुपसून प्रसिद्धी झोकात राहण्याचा प्रयत्न करत असतात.

## महाविकास आघाडी म्हणजे मनमानी सरकार : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर आघाडी सरकारची भूमिका राज्याला भूषणावह नाही. या सरकारने फक्त स्वार्थी आणि निष्क्रिय कारभार केला आहे त्यामुळे एसटी कर्मचार्यांसह प्रवाशांचे नाहक हाल करण्याचे काम महा विकास आघाडी सरकारने सुरु ठेवत आपली मनमानी केली आहे, त्यामुळे महा विकास आघाडी ही मनमानी आघाडी सरकार आहे अशी टीका भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी ट्विटरवर ट्वीटद्वारे केली आहे.



महात्मा जी गांधी के तीन बंदर या युक्तीत वाईट बघू नका, वाईट ऐकू नका, वाईट बोलू नका असे आहे. मात्र महाविकास आघाडीमध्ये उलट आहे. हे सरकार राज्यातील प्रश्नांबाबत काही बघत नाही, ऐकत नाही, बोलत नाही ही भूमिका अत्यंत चुकीची असून पुरोगामी महाराष्ट्राला शोभनीय नाही. एसटी कर्मचा-यांचे कष्ट हे खूप मोठ्या प्रमाणात असते, कर्मचारी म्हणून ते काम करीत असताना त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते अशा परिस्थितीत त्यांना न्याय मिळेल अपेक्षित असताना महा विकास आघाडी जाणून बुजून याकडे दुर्लक्ष करीत आहे.

ठाकरे सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले. त्याचप्रमाणे एसटी कर्मचारी आणि प्रवाशांच्या बाबतीतही तेच घडले आहे. ठाकरे सरकारच्या निष्क्रिय कारभामुळे सर्व जनता चिंतीत झाली आहे. या काळात एसटी कमर्चारी आत्महत्या करू लागला आहे आणि त्याच्या कुटुंबाचा मोठा आधार हरपला जात असताना राज्य सरकार मात्र फक्त बघ्याची भूमिका घेत आहे.

त्यामुळे राज्यातील समस्यांबाबत काही बघायचे नाही, ऐकायचे नाही व त्यावर काही बोलायचे नाही आणि या सर्वातून राज्यातील जनतेचे प्रश्न रेंगाळत ठेवायचे, फक्त सत्ता आणि सत्ता ही कर्मनीती महाविकास आघाडीची असून या तिघाडी सरकारचा निषेध करू तेवढा कमी आहे असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी अधोरेखित केले आहे.

## जासई-दादरपाडा रस्ता पूर्णत्वाच्या प्रतिक्षेत ; सा.बां.चे दुर्लक्ष



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील महत्वाचा असणारा जासई वेश्वि रस्ता सध्या अपूर्ण अवस्थेत असल्याने हा रस्ता पूर्ण कधी होईल याकडे जनतेचे लक्ष लागले आहे. कंत्राटदाराने रस्ता अर्धवट करूनही त्याकडे सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने जनतेत संताप व्यक्त होत आहे.

जासई – दादरपाडा, दिघोडे हा उरण तालुक्यातील सर्वात जुना रहदारीचा रस्ता म्हणून ओळखला जातो. पूर्वी उरण पूर्व विभागातील जनतेला उरण या तालुक्याच्या ठिकाणी जायचे असल्यास याच मार्गाचा वापर होत होता.कालांतराने उरणला विकासाचा स्पर्श होताच विविध ठिकाणी अनेक लहान मोठे उद्योगधंदे उभे राहिले. पर्यायाने या प्रवासी रस्त्यावरून जवजड वाहतुकीची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे रस्त्यावर सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नेहमी निधी खर्च होऊ लागला. तरी या रस्त्यावर सतत मोठ्या प्रमाणात खड्डेच दिसून येत होते.

मात्र या रस्त्यावर दुरुस्तीसाठी सुमारे ६० लाखांचा निधी .../२

## शॉर्ट सर्किटने कळंबोलीत दुकान खाक ; जीवित हानी टळली

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

शॉर्ट सर्किट झाल्याने दुचाकी दुरुस्त करणाऱ्या दुकानातील सामान गुरुवारी सकाळी सहा वाजता आग लागल्याने संपूर्ण जळून खाक घटनेमुळे कळंबोलीतील एल.आय.जी १ सेक्टर ३ मधील हा दुर्दैवी प्रकार घडल्याने गॅरेज वगैरे जी मधील हजारो रुपये किमतीचे सामान जळून खाक झाले. मात्र वेळीच नागरिकांनी सावधानता बाळगल्याने व नागरिक घराच्या बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला. कळंबोली अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेऊन आगीवर वेळीच नियंत्रण मिळवले.

कळंबोली वसाहती सेक्टर १ मधील एक आय.जी. वसाहतीमधील घर नंबर आठ मध्ये तळमजल्यावर दुचाकी दुरुस्त करण्याचे दुकान आहे त्यामध्ये दुचाकी ला लागणारे सामान ही विक्रीस ठेवले जात आहे. दुकानांमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आतील .../२



## नेरळ ग्रामपंचायतीमध्ये डम्पिंग ग्राउंड मधून धुराचे लोट

### ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष, जिल्हा प्रशासन शांत

**दै.रायगड नगरी । कर्जत**


कर्जत ग्रामपन्चायत असलेल्या नेरळ मधील वाढते नागरीकरणास येथील कचरा डेपो आता सर्वाधिक त्रासदायक ठरत आहे. डम्पिंग ग्राउंड कचऱ्याने ओसंडून वाहत असताना



आता हेच कचरा डेपो धुराचे लोट सोडत आहेत. त्यामुळे नेरळ गाव विषारी वायूंच्या धुरात लपले जात असून नेरळ ग्रामपंचायतने तयार केलेल्या नवीन कचरा डेपोमुळे त्यात आणखी भर पडली असून नेरळकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दरम्यान, या कचरा डेपोंकडे नेरळ ग्रामपंचायत दुर्लक्ष करीत असताना त्या पाठोपाठ ग्रामस्थांच्या आरोग्याची काळजी घेणारे रायगड जिल्हा परिषदेची यंत्रणा देखील मूग गिळून गप्प आहेत? याबद्दल नेरळ मधील जागरूक नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

नेरळ या नागरीकरणाकडे झुकलेल्या ग्रामपंचायत मधील रहिवाशांच्या सोयीसाठी पाच वर्षापूवी घनकचरा प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले होते. नेरळ विकास प्राधिकरण त्या प्रकल्पासाठी निधी देणार होते, मात्र पाच वर्षात ना घनकचरा प्रकल्प साकारला नाही. मात्र नेरळ ग्रामपंचायत कडून दोन नवीन कचरा डेपो मात्र तयार झाले आहेत. कर्जत–कल्याण राज्यमार्ग रस्त्याला लागून असलेल्या कचरा डेपो मधील कचरा रस्त्यावर येत असून या कचरा डेपो मध्ये कचरा वाहून नेणारी वाहने जात नसल्याने ग्रामपंचायत प्रशासनाने नवीन कचरा डेपो विकसित केला आहे.या पावसाळ्यापासून नेरळ धरणाच्या .../२

## प्रितम म्हात्रे यांनी केली कृष्णाळे तलावाची पाहणी



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १९ मधील कृष्णाळे तलावाच्या अस्वच्छतेबाबत वृत्तपत्राने दिलेल्या बातमीची दखल घेत विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी प्रशासनाला तलाव स्वछता करण्याचे आदेश देत तलाव स्वछ करून घेतले.

प्रभाग क्रमांक १९ ची एकंदरीत अत्यंत दयनिय अवस्था येथील सत्ताधारी नगरसेवकांनी केली आहे. ह्या प्रभागात प्राथमिक मूलभूत सुविधांचा अभाव आढळत आहे. ना रस्ते, गटार, ड्रेनेज ह्या प्रभागात दुरावस्थेत असल्याचे दिसून येत आहे.

कृष्णाळे तलावाची पाहणी करीत असताना प्रशासनाला सुचना केल्या आहेत. वडाळे तलावाच्या निकृष्ठ कामाच्या दर्जाला येथिल सत्ताधारी आणि ठेकेदार जबाबदार आहेत.असा आरोप करण्यात आला आहे.

# दिलासा आणि आव्हान

कोव्हिड प्रतिबंधक लसीकरणानंतर भारतात दिले जाणारे प्रमाणपत्र अमेरिका, ब्रिटन यांसह ९६ देशांनी स्वीकारार्ह ठरविल्याने आंतरराष्ट्रीय प्रवासाला नव्याने चालना मिळू शकेल. शिक्षण, उद्योग, व्यवसाय, पर्यटन आदी विविध कारणांसाठी परदेशांत जाऊ इच्छिणाऱ्या भारतीयांची लशीच्या मुद्द्यावरून होत असलेली अडवणूक आता थांबू शकेल. भारतात दिल्या जाणाऱ्या 'कोव्हिशील्ड' आणि 'कोव्हॅक्सिन' या दोन्ही लशींना मान्यता देण्यास काही देशांनी सुरुवातीला खळखळ केल्याने; तसेच स्वदेशी बनावटीच्या 'कोव्हॅक्सिन'वर जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) मंजुरीची मोहोर लवकर न उमटल्याने, लस घेऊनही भारतीयांना परदेशांत चाचण्यांना आणि सक्तीच्या विलगीकरणाला सामोरे जावे लागत होते. भारतीय लशीला 'डब्ल्यूएचओ'ची मान्यता मिळावी आणि लस प्रमाणपत्र सर्व देशांनी स्वीकारावे, यासाठी केंद्र सरकारने गेल्या काही दिवसांत जोरकस प्रयत्न केले. याबाबत भारताची अडवणूक करणाऱ्या ब्रिटनला 'जशास तसे' उत्तर देण्याची नीतीही अवलंबली. या साऱ्यांचा योग्य परिणाम झाल्याचे दिसते. ब्रिटनने आडमुठी भूमिका मागे घेतली आणि गेल्या आठवड्यात 'डब्ल्यूएचओ'ने 'कोव्हॅक्सिन'ला मंजुरी दिली. युरोप, आफ्रिका, दक्षिण अमेरिका, आशिया, ऑस्ट्रेलिया आदी विविध खंडांतील बहुतेक देशांनी भारतीय लस प्रमाणपत्र मान्य करण्यास सहमती दर्शविल्याने, लसीकरण झालेल्या भारतीयांना सुलभपणे आंतरराष्ट्रीय प्रवास करता येईल. या सर्व देशांतील प्रवासीही भारतात येऊ शकतील. देशात सध्या करोनाची साथ आटोक्यात आली असली आणि लसीकरणाने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला असला, तरी दोन्ही मात्रा घेणाऱ्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याने, परदेशी प्रवाशांची संख्या कितपत वाढेल याबाबत साशंकता आहे; तथापि ९६ देशांची प्रमाणपत्र स्वीकारार्हता वातावरण निर्मितीसाठी उपयुक्त आहे. वातावरण निर्मितीला पूरक अशी बाब राज्यातही घडली आहे. राज्यातील लसीकरणाने दहा कोटींचा टप्पा ओलांडला असून, यामुळे सर्व व्यवहार पूर्वपदावर येण्यास मदत होणार आहे. राज्यात ९.१४ कोटी प्रौढांना लस द्यायची असून, त्यांपैकी ६.८० कोटी नागरिकांना पहिली मात्रा देण्यात आली आहे, तर ३.२० कोटी लोकांच्या दोन्ही मात्रा झाल्या आहेत. सर्व प्रौढांना दोन्ही मात्रा देण्यासाठी आणखी आठ कोटी जणांचे लसीकरण गरजेचे आहे. दहा कोटींचा टप्पा ओलांडणारे महाराष्ट्र हे दुसरे राज्य ठरले आहे. उत्तर प्रदेशने हा टप्पा सप्टेंबरमध्येच ओलांडला. लसीकरणाच्या बाबतीत देशाची आणि राज्याची आतापर्यंतची नक्कीच कामगिरी समाधानकारक म्हणावी लागेल. १३५ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात प्रत्येकाला लशींच्या दोन मात्रा कमीत कमी कालावधीत देणे आव्हानात्मक होते. याबाबतीत युरोपीय देशांशी किंवा चीनशी तुलना करणे चुकीचे ठरेल. युरोपीय देशांत किंवा अमेरिकेत तुलनेने लोकसंख्या कमी आहे आणि त्यांनी लशींच्या पुरेसा साठ्याची तरतूदही केली होती. चीनची लोकसंख्या भारतापेक्षा अधिक असली, तरी तिथे एकाधिकारशाही आहे. भारतात सुरुवातीला लस आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध नव्हती; त्यामुळे सर्व नागरिकांचे लसीकरण कसे होईल याची चिंता होती. न्यायालयांनीही ती बोलून दाखविली होती; मात्र रेटा वाढल्यावर केंद्र सरकारने लसीकरणासाठी आक्रमक मोहीम हाती घेतली आणि इच्छाशक्तीद्वारे ती राबविलीही. राज्य सरकारनेही लसीकरणावर भर दिला. अर्थात, शंभर कोटींचा किंवा दहा कोटींचा टप्पा गाठला म्हणून ढिलाई करून चालणार नाही. प्रत्येक प्रौढाला लशींच्या दोन्ही मात्रा मिळाल्याखेरीज ही मोहीम पूर्ण होणार नाही. पूर्वीच्याच आक्रमकतेने ही मोहीम पुढे नेण्याचे आव्हान त्यामुळेच आहे. करोनाची साथ कमी झाल्यामुळे असेल किंवा लशीची एक मात्रा घेतल्यामुळे असेल, दुसरी मात्रा घेण्याबाबतचा उत्साह अनेकांत कमी झाल्याचे दिसत आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातही याबाबतचा निरुत्साह दिसतो आहे. घरोघरी जाऊन लसीकरण करण्याचा केंद्राचा निर्णय म्हणूनच योग्य आहे. त्याची तातडीने अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. पुणे जिल्ह्यात सुमारे दहा लाख नागरिकांची दुसरी मात्रा घेण्याची मुदत उलटली आहे; तरीही ते लस घेण्यासाठी पुढे आलेले नाहीत. पुरेसा लससाठा असूनही लसीकरणाचा वेग मंदावला आहे. ही स्थिती बदलायला हवी. त्याचबरोबर लहान मुलांचे लसीकरणही सुरू करायले हवे. कोव्हिडची दुसरी लाट तीव्र झाल्यानंतर स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मार्फत ज्या पद्धतीने लसीकरणाला गती दिली गेली, तसेच आता करायला हवे. कोव्हिडचा धोका अद्याप टळलेला नाही; तिसऱ्या लाटेची शक्यता पूर्णपणे नाकारली गेलेली नाही. युरोपीय देशांत करोनाचे नवे रुग्ण अधिक संख्येने आढळू लागले आहेत. संपूर्ण लसीकरणाचे आव्हान पेलले, तरच कोव्हिडला प्रतिबंध करता येईल आणि सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक जीवन पूर्ववत होईल.

# उरण-चारफाटा येथील अनधिकृत टपऱ्या ; गाळ्यावर सिडकोच्या अतिक्रमण विभागाची कारवाई

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण चारफाटा, नविन शेवा दरम्यान अनधिकृतरित्या वसविण्यात आलेल्या सुमारे ६० टपऱ्या, गाळे सिडकोच्या अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी काल गुरुवारी पोलिस बंदोबस्तात बुलडोझर लाऊन जमीनदोस्त केल्या. उरण चारफाटा नवीन शेवा रस्त्याच्या दरम्यान दुतर्फाबाजुला सिडकोच्या जागेवर मटण शॉप, टायर, चायनीज स्टॉल आदी अनेक टपऱ्या, गाळे अनधिकृतपणे उभारण्यात आल्या आहेत.

या बेकायदेशीर उभारण्यात आलेल्या टपऱ्या गाळ्यांमुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत होता. या विरोधात काल सिडकोच्या अतिक्रमण नियंत्रण कक्षाचे अधिकारी मोहसीन शेख यांच्या देखरेखीखाली कारवाई करण्यात आली. पोलिस बंदोबस्तात करण्यात आलेल्या कारवाईत ६० टपऱ्या, गाळे बुलडोझर लावून जमीनदोस्त करण्यात आले.

सिडकोच्या अतिक्रमणाची कारवाई सुरू होती. त्याचवेळी एक पार्किंग करून उभा असलेल्या खासगी ट्रक वाहन चालक मागे घेत होता. मात्र चालकांच्या हलगर्जीपणामुळे ट्रकखाली झोपलेला एक इसम टायरखाली येऊन चिरडला. मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली.



# आदिती तटकरे यांचा आज म्हसळा तालुका दौरा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

आज शुक्रवार दिनांक १२ नोव्हेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड जिल्हा कु.आदीती तटकरे यांच्या हस्ते म्हसळा तालुक्यातील मंजुर विकास कामांचे भूमिपूजन व उदघाटन कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

सकाळी ११ वाजले पासुन ते सायंकाळी ४.१५ वाजेपर्यंत म्हसळा तालुक्यात विशेषतः खाडी विभागातील मौजे पाष्टी गौळवाडी रस्ताभूमिपुजन, पाष्टी बौद्धवाडी बुद्धविहार भूमिपुजन, मांदाटणे येथे साठवण तलाव उद्धाटन, मौजे कुडगाव रस्ता भुमिपुजन,मौजे फळसफ येथे साकव भुमिपुजन, मौजै संदेरी बौद्धवाडी रस्ता भूमीपुजन, संदेरी बौद्धवाडी साकव भुमिपुजन, संदेरी मोहल्ला सामाजिक सभागृह भुमिपुजन, मौजे आंबेत वलजारवाडी रस्ताचे भुमिपुजन, आंबेत मोहल्ला रस्ताचे भुमिपुजन, आंबेत बौद्धवाडी अंतर्गत रस्ता भुमिपुजन पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते करण्यात येणार आहेत. याच वेळी पालकमंत्री तब्बल ५ कोटी रुपये खर्च करून नवीन उभारण्यात आलेले आंबेत प्राथमिक आरोग्य केंद्र नविन इमारतीची पहाणी करणार आहेत. आयोजित भरगच्च कार्यक्रमास तालुक्यातील मान्यवर लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, पदाधिकारी आणि हितचिंतक यांनी उपस्थित राहण्याचे निमंत्रण राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष समीर बनकर यांनी सांगितले आहे.

# महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कोणत्याही कार्यालयावर ईडीचे छापे पडलेले नाहीत : ना. नवाब मलिक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

वक्फअंतर्गत नोंदणीकृत असलेल्या पुणे जिल्ह्यातील एका संस्थेवर अंमलबजावणी संचालनालयामार्फत (ईडी) छापा पडल्याची माहिती मिळाली आहे. तथापी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या कोणत्याही कार्यालयावर छापे पडलेले नाहीत, यासंदर्भात चुकीची माहिती प्रसारीत होत असल्याने स्पष्टीकरण करत अल्पसंख्याक विकास मंत्री नवाब मलिक यांनी सांगितले. तथापी, वक्फ मंडळाचे कामकाज अधिक पारदर्शक करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने मागील २ वर्षात अनेक महत्वाची पाऊले उचलली आहेत. मागील २ वर्षात राज्यातील वक्फ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या आणि गैरव्यवहार करणाऱ्या ७ संस्थांवर कारवाई करुन एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. ईडीमार्फत छापा टाकण्यात आलेल्या संस्थेवरही वक्फ मंडळाच्या पुढाकाराने आधीच कारवाई करण्यात आली आहे. गैरव्यवहार करणाऱ्या संस्थांवर ईडी कारवाई करत असेल तर त्याचे आम्ही निश्चितच स्वागत करु. पण याच्या आधारे वक्फ मंडळाची किंवा व्यक्तिश: माझी बदनामी करण्याचा प्रयत्न करु नये, असे त्यांनी सांगितले. मंत्रालयात झालेल्या पत्रकार परिषदेत मंत्री श्री.मलिक बोलत होते.

ईडीमार्फत करण्यात आलेल्या कारवाईच्या अनुषंगाने माध्यमांमध्ये चुकीची माहिती प्रसारीत होत आहे. त्यामुळे ईडीने नेमकी काय कार्यवाही केली याबाबत संदीग्धता निर्माण न करता अधिकृत माहिती प्रसारीत करुन जनतेला योग्य माहिती द्यावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

अल्पसंख्याक विकास मंत्री श्री. मलिक म्हणाले की, ताबुत इंडोमेंट ट्रस्ट (ता. मुळशी, जि. पुणे) या संस्थेच्या अनुषंगाने ईडीमार्फत छापा टाकून कारवाई करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे. या संस्थेवर राज्य शासनाच्या वक्फ मंडळामार्फत आधीच कारवाई सुरु करण्यात आली आहे. जमीन अधिग्रहणाच्या मोबदल्यासाठी या संस्थेला मिळणाऱ्या ७ कोटी ७६ लाख रुपये इतक्या रकमेचा अपहार केल्याप्रकरणी इम्तियाज शेख व चाँद मुलाणी यांच्याविरुद्ध १३ ऑगस्ट २०२१ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय वक्फ इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खालसा करणे, विक्री करणे, अवैधरित्या मावेजा घेणे, अवैध भाडेपट्टीवर देणे या कारणास्तव राज्यातील विविध ठिकाणच्या ७ संस्थांवर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या पुढाकाराने एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. आष्टी (जि. बीड) येथील एका प्रकरणात उपजिल्हाधिकाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळामार्फत राज्यातील संस्थांचा कारभार पारदर्शक व्हावा यासाठी मागील २ वर्षात कार्यवाही करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

वक्फ इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खालसा करणे, विक्री करणे, अवैधरित्या मावेजा घेणे व अवैध भाडेपट्टीवर देणे या कारणास्तव मागील २ वर्षात एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. ताबूत इंडोमेंट ट्रस्ट, (जि. पुणे), जुम्मा मस्जिद (बदलापूर, जि. ठाणे), दर्गा मजीद गैबी पीर (चिंचपूर, आष्टी, जि. बीड), मज्जीद देवी (निमगाव, ता. आष्टी, जि. बीड), दर्गा बुरहान शाह व इदगाह (जिंतूर रोड, परभणी), मज्जित छोटा पंजतन (परतुर, जि. जालना), दर्गा नुरुल हुदा मज्जिद कब्रस्तान (दिल्ली गेट, औरंगाबाद) या संस्थांवर महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या पुढाकाराने आतापर्यत कारवाई करण्यात आली आहे.

राज्यात वक्फ मंडळांतर्गत सुमारे ३० हजार संस्था नोंदणीकृत असून त्यांचा कारभार पारदर्शक व्हावा यासाठी वक्फ मंडळामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत. गैरव्यवहार करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे, अशी माहिती मंत्री श्री. मलिक यांनी दिली.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## जासई–दादरपाडा रस्ता पूर्णत्वाच्या प्रतिक्षेत ; सा.बां.चे दुर्लक्ष

मंजूर होऊन यावर्षीच्या मे महिन्या अगोदर सदर रस्त्याचे काम सुरू होते. मात्र त्यांनी जासई ते दादरपाडा या रस्त्याचे काम अर्धवट करून त्यावर डांबरीकरण न करताच तसेच ठेवले. पर्यायाने पावसाळ्यात अवजड वाहतुकीमुळे हा रस्ता अनेक ठिकाणी उध्वस्त होऊन रस्त्यात खड्डे निर्माण झाले आहेत.

हा रस्ता पूर्ण होण्यासाठी जासई, चिर्ले, वेश्वि येथिल ग्रामपंचायतींनी अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार करूनही त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने जर पंधरा दिवसाच्या आत या रस्त्याच्या पूर्णत्वाचे काम सुरू झाले नाही तर वेश्वि, चिर्ले, जासई गावातील जनता रस्तावर उतरून आंदोलन करेल असा इशारा वेश्वि ग्रामपंचायत चे माजी सरपंच विलास पाटील यांनी दिला आहे.

## शॉर्ट सर्किटने कळंबोलीत दुकान खाक ; जीवित हानी टळली

प्लास्टिक रबर च्या वस्तू ने पेट घेतल्याने आगीच्या ज्वाळा मोठ्या प्रमाणावर दुकानाच्या बाहेर पडू लागल्या. दुकानाचे शटर बंद असल्याने नेमकी आग कशामुळे लागली हे लक्षात आले नाही. मात्र वेळीच दुकानाचे शटर उघडल्याने आगीचे कारण लक्षात आले. आगीच्या ज्वाळा येवढ्या मोठ्या होत्या की दुकानाच्या वर राहणाऱ्या रहिवाश्यांना आगीच्या मोठा झळा लागू लागल्या त्यामुळे वेळीच आजूबाजूच्या नागरिकांनी घरात राहणाऱ्या नागरिकांना बाहेर काढून जीविताचे रक्षण केले .याबाबत कळंबोली अग्निशामक दलाला माहिती देण्यात आल्यानंतर अग्निशामक दलाचे प्रमुख घटनास्थळी दाखल झाले व त्यांनीआगीवर नियंत्रण मिळवले . या आगीत दुचाकी दुरुस्त करण्याचे व विक्रीस ठेवलेले हजारो रुपयाचे सामान जळून खाक झाले.

## नेरळ ग्रामपंचायतीमध्ये डम्पिंग ग्राउंड मधून धुराचे लोट

खाली असलेल्या पुलाच्या खाली कचरा नेवून टाकला जात आहे. हा कचरा दररोज टाकला जात असून त्यातून निर्माण झालेल्या दुर्गंधीमुळे परिसरात राहणे कठीण होऊन बसले आहे. पायवाटेने जाणारे आणि तेथे असलेल्या स्मशानभूमी मध्ये अंत्यसंस्कार साठी आलेल्या लोकांना नाकाला रुमाल किंवा मास्क लावूनच घाटावर उभे राहावे लागत आहे.पावसाळ्यात तर या कचरा डेपो मधील कचरा नेरळ ग्रामपंचायत कडून जेसीबी मशीनच्या साहाय्याने महापुराच्या पाण्यात सोडण्यात आला आणि त्यामुळे उल्हास नदीचे प्रदूषण वाढले असताना पाटबंधारे विभाग काहीही कारवाई करताना दिसत नाही.

आता मात्र नेरळ ग्रामपंचायत या कचरा डेपोंमधून धुराचे लोट बाहेर पडत आहेत. नेरळ गावातील दोन कचरा डेपो हे लोकवस्तीला लागून आहेत. तर तिसरा डेपो कोल्हारे ग्रामपन्चायतच्या नवीन लोकवस्तीचा लागून आहे. त्यामुळे धुराचे लोट दिवसभर नेरळकरांचे आरोग्य धोक्यात आले आहेत. त्यात रात्री तर सर्वत्र शांतता पसरल्यानंतर हा विषारी वायू वाहून नेणारा धूर जनतेचे आरोग्य धोक्यात आणत आहे. या धुरामुळे नेरळकरांना श्वसनाचे आजार जडले आहेत.दुसरीकडे धरणाच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना दारे खिडक्या बंद ठेवूनच राहावे लागत असल्याने असे कुटुंबीय गुदमरत आहेत. मात्र याचे काहीही सोयरसुतक नेरळ ग्रामपन्चायतला नाही. तर कचऱ्यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असतांना त्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी हि रायगड जिल्हा परिषदेची असते. मात्र वायू प्रदूषण रोखण्याचे कोंणतेही काम जिल्हा परिषद कडून होताना दिसत नाही आणि या कचरा डेपोबाद्द्ल जिल्हा परिषद हस्तक्षेप करीत नाही. रायगड जिल्हा परिषदेच्या या भूमिकेबद्दल देखील कुतूहल निर्माण झाले आहे.

उल्हासनदीचे होणारे प्रदूषण,स्थानिक रहिवाशी यांचे कचरा जळाल्याने होणारे वायू प्रदूषण याबद्दल रायगड जिल्हा ग्रामपन्चायतला जाब विचारात नाही. तर रहिवाशांना भेडसावणारे श्वसनाचे आजार याबद्दल देखील खबरदारी नेरळ ग्रामपंचायत घेत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे.

# 30 नोव्हेंबरपर्यंत कोविड प्रतिबंधात्मक लशीची पहिली मात्रा देण्याचे उद्दिष्ट : राजेश टोपे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील सर्व पात्र नागरिकांना येत्या ३० नोव्हेंबर पर्यंत कोविड प्रतिबंधात्मक लशीची पहिली मात्रा देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी आज दिली.

केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी आज सर्व राज्यांचा कोविड प्रतिबंधात्मक लसीकरणाचा आढावा घेतला. या बैठकीत श्री. टोपे मंत्रालयातून दूरदृश्यप्रणालीव्दारे सहभागी झाले. त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली. यावेळी अपर मुख्य सचिव डॉ प्रदीप व्यास उपस्थित होते.

श्री. टोपे यांनी सांगितले की, राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने व्यापक प्रयत्न केले जात आहेत. लसीकरणाची गती वाढावी यासाठी मिशन कवच कुंडल, मिशन युवा स्वास्थ्य सारखे अभियान राबविण्यात आले. याचा लसीकरणाचा वेग वाढविण्यासाठी फायदा झाला. आता लसीकरणाची शिबीर आणि वेळही वाढवली जात आहे. लसीकरणाच्या मोहिमेत आरोग्य, महसूल, नगरविकास, शिक्षण अशा विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी एकत्रित काम करीत आहेत.

लसीकरणाबाबत नागरिकांच्या मनात असलेल्या शंका दूर करण्यासाठी जनजागृती केली जात आहे. यासाठी ओपिनियन लीडर्स, धर्मगुरु यांच्या माध्यमातून प्रयत्न केले जात आहेत, असेही त्यांनी सांगितले.

कोविड प्रतिबंधात्मक कोवैक्सिन लशीच्या दोन मात्रांमध्ये २८ दिवसांचे अंतर निश्चित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे कोविशिल्ड लशीच्या दोन मात्रांमध्ये ८४ दिवसांचे अंतर निश्चित करण्यात आले आहे. कोविशिल्ड लशीच्या दोन मात्रा मधील अंतर कमी केले तर लसीकरणाच्या वेगाला गती देता येईल. याबाबत विचार केला जावा अशी विनंती श्री टोपे यांनी केंद्रीय आरोग्यमंत्री मांडविया यांना केली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आम्ही मौजे : वेश्वी, ता.उरण, जि.रायगड येथील खाली नमूद केलेली मिळकत नरेंद्र शंकर मुंबईकर यांजकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| वेश्वी, ता.उरण, जि.रायगड | ४४/१/अ | ०-२०-४० पो.ख.०-०६-७० | ४.०० |
| | २९/२/ब | ०-१७-०० | ०.३७ |

तरी सदर मिळकतीचे बाबतीत अथवा तिच्या कोणत्याही हिश्श्याचे बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्तखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, लीन, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा वगैरे कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी हरकती प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आम्ही सदर मिळकतीचे विक्री व हस्तांतरणाचे व्यवहार पूर्ण करू व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.११/११/२०२१

**सही/-**
**कनू एम.ठक्कर**
**७, राधा निवास, ७ राजावाडी रोड,**
**घाटकोपर (पू), मुंबई-४०००७७**
**मो.नं.९३२२५५१४१४**


# महाडमधील तळीये दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना मंगेश कुडाळकर यांनी दिली सांत्वनपर भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील तळीये या दरडग्रस्त भागाची विधानसभा सदस्य व महाराष्ट्र विधान मंडळ इतर मागासवर्ग कल्याण समिती प्रमुख श्री.मंगेश कुडाळकर आणि विधानसभा सदस्य व समिती सदस्य अभिजित वंजारी यांनी आज पाहणी केली. तसेच त्यांनी दुर्घटनेत मृत पावलेल्या नागरिकांना पुष्प अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. इतर मागासवर्ग कल्याण समिती तीन दिवसीय जिल्हा दौऱ्यावर आली असून काल (दि.१० नोव्हेंबर) रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी महाडमधील तळीये या गावात दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेबाबतची त्याचप्रमाणे दुर्घटनाग्रस्त कुटुंबांना जिल्हा प्रशासनाने केलेल्या मदतीबाबतची माहिती समिती प्रमुख तसेच इतर समिती सदस्यांना दिली होती. या पार्श्वभूमीवर तळीये गावाचे पुनर्वसन ज्या ठिकाणी करण्यात आले आहे त्या ठिकाणी जावून तेथील नागरिकांची समिती प्रमुख श्री.कुडाळकर व समिती सदस्य श्री.वंजारी यांनी आस्थेने विचारपूस केली.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे : कोन, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथिल खालील वर्णनाची यांचे मालकीची शेतजमिन मिळकत, त्या शेतमिळकतींचे विद्यमान शेतजमिन मालक यांचेकडून एकूण शेतजमिन क्षेत्र ०-४३-० गुंठे क्षेत्रा पैकी विरार- अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करीता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-२५-० गुंठे कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले असुन तसा करार उभयपक्षी यांचेत स्वाक्षरीत झाला आहे .

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोन, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतींचे वर्णन**

| शेतजमिन मालकांचे नाव व गाव | गट क्रमांक | उप विभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|---|
| श्री.दिनकर आंबो म्हात्रे, श्री.अनंता आंबो म्हात्रे, श्री.चेतन राघो म्हात्रे, कु.शितल राघो म्हात्रे, प्रियांका राघो म्हात्रे, वैभव राघो म्हात्रे, निशांत राघो म्हात्रे, कमला राघो म्हात्रे, हिराबाई आंबो म्हात्रे, जनाबाई धर्मा म्हसकर सर्व राहणार : मु. कोन, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड | २९ | ५ ब | ०-४३-० | ३.१३ |

वर वर्णन शेतजमिन शेतजमिन मालक श्री.दिनकर आंबो म्हात्रे, श्री.अनंता आंबो म्हात्रे, श्री.चेतन राघो म्हात्रे, कु.शितल राघो म्हात्रे, प्रियांका राघो म्हात्रे, वैभव राघो म्हात्रे, निशांत राघो म्हात्रे, कमला राघो म्हात्रे, हिराबाई आंबो म्हात्रे, जनाबाई धर्मा म्हसकर सर्व राहणार : मु.कोन, पो.अजिवली, ता पऩवेल, जि.रायगड यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबे, कब्जा वहीवाटीतील असुन, ०-४३-० गुठे शेतजमिन क्षेत्रापैकी पैकी विरार- अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करीता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-२५-० गुंठे विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यामान शेतजमिन मालक श्री.दिनकर आंबो म्हात्रे, श्री.अनंता आंबो म्हात्रे, श्री.चेतन राघो म्हात्रे, कु.शितल राघो म्हात्रे, प्रियांका राघो म्हात्रे, वैभव राघो म्हात्रे, निशांत राघो म्हात्रे, कमला राघो म्हात्रे, हिराबाई आंबो म्हात्रे, जनाबाई धर्मा म्हसकर यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखिल वर वर्णन केलेल्या एकूण शेतजमिन मिळकती पैकी विरार- अलिबाग मल्टी मॉडेल कॉरिडॉर करीता संपादीत होत असलेले क्षेत्र ०-२५-० गुंठे अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचेही विक्री, बक्षिसपत्र, कुलमुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसा हक्क, लिज लिन, चार्ज, पोटगी ताबा, कब्जा, वहीवाट, इजमेंटरी हक्क, कुळ हक्क, दिवाणी दावा, महसुल वाद या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांचे हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसाचे आत खालील आमचे कार्यालयाचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात आणुन द्यावीत. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यामान शेतजमिन मालकांच्या निर्वेध व र्निजोखमी मालकी हक्कांची आहे व तीचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यामान शेतजमिन मालकांच्या तसेच आमचे अशिलांचे लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन मुदती नंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ११/११/२०२१

**सही /-**
**अॅड. आनंद बी. केदारी**
**बी.ए.एल.एल.बी.**
**शॉप नं ३१, पहिला मजला, पनवेल महानगर पलिका कॉम्पलेक्स, कृष्णाळे तलावाचे विरूध्द वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाचे बाजुला, पनवेल,ता. पनवेल, जि. रायगड-४१०२०६**
**मो.नं.९३२२७५०७२९**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पतीने केली पत्नीस चाकूने दुखापत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्नीने नवीन मोबाईल घेवून न दिल्याचा राग मनात धरुन पतीने तिला शिवीगाळ करून तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर किचनमधील चाकूने मारुन तिला दुखापत केल्याची घटना डेरवली गावात घडली आहे.

या ठिकाणी राहणारे कुणाल साठवणे (२९) याला पत्नीने नवीन मोबाईल घेवून न दिल्याचा राग मनात धरुन पतीने तिला शिवीगाळ करून तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर किचनमधील चाकूने मारुन तिला दुखापत केल्याची घटना घडल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून निराधार व विधवा महिलांना मदतीचा हात



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील सुप्रसिद्ध अशा श्री साई नारायणबाबा मंदिरातील श्री नारायणबाबा चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून परिसरातील निराधार व विधवा महिलांना आज धान्याचे वाटप करण्यात आले.

या चॅरिटेबल ट्रस्टचे रामलाल चौधरी तसेच दुबई येथील नारायणबाबा भक्त अजुन आसवानी यांच्यामार्फत १४० महिलांना धान्याचे वाटप करण्यात आले. दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारी या संस्थेमार्फत साई मंदिरातून अशा प्रकारे महिलांना वाटप करण्यात येते. यासाठी त्यांच्या रेशनकार्डची नोंद करण्यात येते. तसेच शालेय विद्यार्थ्यांना दररोज मोफत दुध व नाष्टा, शिक्षण, औषध याचे वाटप करण्यात येते. या संस्थेच्या माध्यमातून अनेक जणांची सामुहिक विवाह येथे लावण्यात आले आहेत. तसेच कोरोना काळामध्ये शासनाला आर्थिक मदत सुद्धा केली आहे. त्याचप्रमाणे राममंदिर उभारणीसाठी आ.प्रशांत ठाकूर यांच्याकडे या संस्थेने धनादेश सुपूर्द केला आहे. विविध सामाजिक उपक्रम या संस्थेमार्फत सातत्याने राबविण्यात येत असल्याने हे मंदिर म्हणजे हजारो गोरगरीबांचे आशास्थान बनले आहे.

# ठेकेदार जे. कुमार यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

जासई गावाजवळ झालेल्या उड्डाणपूल अपघातात एक नव्हेतर इतरांचा ही मृत्यू झाला असल्याचा संशय येथील ग्रामस्थांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला. संबंधित ठेकेदार हा मुबंईत ब्लॅक लिस्टमध्ये असतानाही या ठिकाणी उड्डाण पुलांची कामे सुरु आहेत. तरी या प्रकरणी सखोल चौकशी करून ठेकेदार जे. कुमार यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची मागणी केली असल्याचे समजते.

जेएनपीटीच्या तीन हजार कोटी खर्च करून उभारण्यात येत असलेल्या सातपैकी जासई उड्डाणपुलावरील २० क्रमांकाचा पीयर कॅपचा स्लॅब भरताना बूम प्लेअरला क्रेनचा धक्का लागून परात अचानक कोसळली. या घटनेत एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला असून सहा कामगार गंभीर जखमी झाले असल्याचे सांगितले जात आहे. सदर घटना मंगळवारी सायंकाळी पाच वाजता घडली.

सदर कामांच्या ठिकाणी सतत जवळपास ३० ते ४० कामगार काम करीत असतात मग अपघात झाला त्यावेळी फक्त १० ते १२ कामगारच ठेकेदाराकडून दाखविले जात आहेत.



मग इतर कामगार यावेळी कुठे होते याची चर्चा सुरु आहे. ठेकेदार जे. कुमार यांनी प्रशासनाची दिशाभूल करून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा येथील ग्रामस्थांमध्ये सुरू आहे. जासई गावातील काही नागरिकांनी या अपघातात ८ ते १० जणांचा बळी गेला असल्याचा संशय व्यक्त करीत कामाचा दर्जा निकृष्ठ असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. १५ ते २० मीटर उंचीवर पीयर कॅपच्या स्लॅब भरण्याच्या कामासाठी परातीही बांधल्या होत्या. त्यावर १०-१५ कामगार काम करीत असल्याचे सांगितले जाते. यावेळी अचानक परातीला स्लॅब भरणारी बूम प्लेअरचा धक्का लागला. या धक्क्याने परात स्लॅब, स्टील, मलब्यासह खाली कोसळला. या स्लॅब, स्टील, मलब्यात एक कामगार जागीच ठार झाला. तर सहा कामगार गंभीर जखमी होऊन त्यांच्यावर दवाखान्यात उपचार सुरू असल्याचे सांगितले जात आहे.

पीयर कॅप भरताना परातीला बूम प्लेअरचा क्रेनचा धक्का लागून स्टील, मलब्यासह खाली परातीसह अचानक कोसळून अपघात झाल्याची माहिती ठेकेदार जे. कुमार कंपनीचे सहायक अभियंता पीराजी कांबळे यांनी दिली. मात्र यापूर्वीच ठेकेदार जे. कुमार यांना मुंबईमध्ये ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात आले असताना त्यांना या परिसरातील उड्डाणपुलांची कामे मिळत असल्याने संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या ठिकाणी वापरण्यात येणारे मटेरियल ही अत्यंत निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिसून येते तसेच येथे काम करणार्या कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कोणतीच खबरदारी घेतली जात नाही. काम करणारे कामगार हे परप्रांतीय असून कमी पगारात त्यांच्याकडून वेठबिगारीसारखे काम करून घेतले जाते, आमचा नाईलाज असल्याने पोटापाण्यासाठी काम करीत असल्याचे कामगारांनी सांगितले. तरी या अपघाताची सखोल चौकशी केली तर नक्कीच बळींचा आकडा जास्त असल्याचे उघड होईल अशी चर्चा दबक्या आवाजात या परिसरात सुरू आहे. मुंबईत ब्लॅक लिस्ट असलेल्या ठेकेदार जे. कुमार यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून या ठिकाणीही त्यांना ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची मागणी करण्यात आली आहे.

# परप्रांतीय माणगांववासियांनी साजरी केली छटपूजा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

उत्तरप्रदेश, बिहार, झारखंड, नेपाळचे मुळनिवासी असलेले अनेक परप्रांतिय नोकरी धंद्या निमीत्ताने येथे येऊन माणगांववासिय झाले आहेत. बुधवार दि. १० नोव्हेंबर रोजी सुर्यास्ताचे वेळी व गुरुवार दि. ११ नोव्हेंबर सुर्योदयाचे वेळी या हिंदूधर्मिय परप्रांतियांनी माणगांवच्या काळनदी किनारी महिला, पुरुष लहान मुल-मुली एकत्र जमुन जल्लोषात छठपूजा साजरी केली. यावेळी विशेष नटुनथटुन आलेल्या महिलांनी कपाळी कुंकू भांगात ठसठसित सिंदूर भरुन डोक्यावर पदर, हाती छठपुजेचे साहित्य असलेल सुपडे घेऊन नदीचे पात्रात उतरुन पाण्यात उभे राहुन सुर्यदेवतेला अर्ध्य देत मनोभावे उपासना केली.



छठ पूजेचे कठीण व्रत करणारे भाविक सुर्य देवतेला अर्ध्य देऊन या दिवशी ३६ तासांचा निर्जला उपास करतात. या व्रतामुळे भाविकांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात. संतानप्राप्ती, पुण्यसंचय, सुखसमृध्दी साठी ही पूजा केली जाते अशी या लोकांची श्रध्दा आहे. वेदपुराणातील माहितीनुसार सुर्य व सुर्यदेवाची बहिण छठ देवीला प्रसन्न करण्यासाठी ही पूजा केली जाते. महाराष्ट्रीय लोक संक्रांतीला जशी सूर्याची उपासना करतात, त्याप्रमाणे उत्तर भारतीय लोक कार्तिक महिन्याच्या शुक्ल षष्ठीपासून अर्थात दिवाळीनंतर छठ पूजा करतात. याला सूर्य षष्ठी पूजा असेही म्हणतात. असे म्हटले जाते कि छठ पूजेचा सुरवात सूर्यपुत्र कर्णाने आपल्या कवच-कुंडलांची शक्ती वाढविण्यासाठी केली होती. कर्ण रोज सकाळी पाण्यात उभा राहून सूर्यदेवाची उपासना करत सूर्याला अर्घ्य देऊन मगच दिवसाची सुरुवात करत असे. महाभारतातील राजकारणात द्युतात सर्वकाही गमावलेल्या पांडवांना त्यांचे गतवैभव परत मिळावे, म्हणून द्रौपदीने देखील सूर्याची उपासना केली. सूर्य देवांच्या आशीर्वादाने तिची मनोकामना पूर्ण झाली. विशेष म्हणजे बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश नेपाळ या प्रदेशातील लोक आता जगभर पसरल्यामुळे त्यांचे सोबत छठ पुजेची परंपरा आता सर्वदूर पसरली आहे. सूर्यप्रकाशाचे महत्त्व जाणून आपल्या संस्कृतीने सूर्योपासना व सूर्यनमस्काराचे संस्कार घातले आहेत. दिवाळीचा कालावधी थंडीचा. अशात उबदार किरणांनी शरीराला हायसे वाटावे, सर्दी, ताप यांसारख्या किरकोळ आजारां पासून सुटका व्हावी, यादृष्टीनेही छठ पूजेचे महत्त्व लक्षात घेतले जाते.

# रांगोळी प्रदर्शनाचे प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते उदघाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रंगदीप क्रिएशन्स पनवेल तर्फे व्ही. के. हायस्कूल, पनवेल येथे रांगोळी प्रदर्शनाचे विरोधी पक्षनेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून उदघाटन करण्यात आले. यावेळी व्ही. के. हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक श्री.गोगटे सर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. रविवार दि.०५/११/२०२१ ते रविवार दि.१५/११/२०२१ पर्यंत सदर रांगोळी प्रदर्शन नागरिकांसाठी विनामूल्य सुरू आहे. सकाळी १० ते १ आणि संध्याकाळी ५ ते ९ यामध्ये पनवेलकर नागरिक त्या ठिकाणी भेट देऊन सदर प्रदर्शन पाहू शकतात. दिवाळीनिमित्त रंगदीप क्रिएशन्स पनवेल तर्फे रंगावली/रांगोळी प्रदर्शन आयोजित केलेल्या प्रदर्शनाला जास्तीत जास्त रसिकांनी भेट द्यावी व कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केले.




## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, माझे अशिल श्री.नामदेव पांडुरंग भगत राहणार : खारघर गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना फाईल नं.२५, येथील खारघर नोड, प्लॉट नं.३५+३६ प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड शेतकरी यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत देण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक २५ खारघर नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| खारघर | ३४ सी | ३५+३६ | ३३३.९७ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लीज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो. पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो. प्लॉट नं.ई-१२४,**
**सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३/७९७७६८९७३१**

## जाहीर नोटीस

अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण, म्हसळा यांचे कोर्टात
दावा क्र.०००६/२०२१
ने.ता.२४/११/२०२१

१) रमेश गोपाळ गायकर
२) मनोज तुकाराम गायकर
३) रामचंद्र गोपाळ गायकर
सर्व रा.सालविंडे, ता.म्हसळा, जि.रायगड वादी (कुळ)
विरुद्ध
१) नाजुरा समद शेख
२) नदीम अहमद खानजादे
३) नौशाबा तारीक खोपकर
४) सुरैया अहमद खानजादे
सर्व रा.सालविंडे, ता.म्हसळा, जि.रायगड प्रतिवादी (जमीनमालक)

या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार (कुळ) यांची महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ (ग) अन्वये अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या आणि कुळ म्हणून धारण केलेल्या जमिनी खरेदी करण्याची इच्छा आहे. त्याकामी सामनेवाला (जमीनमालक) यांना नोटीसची बजावणी दिलेल्या पत्यावर झालेली नाही. सामनेवाला (जमीनमालक) सध्या कोठे राहतात याची माहिती नाही.

तरी वरील सामनेवाला (जमीनमालक) आणि अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या मिळकतीमध्ये ज्यांचा हितसंबंध असेल त्यांनी अगर त्यांचे हक्क सांगणारे त्यांचे वालीवारस यांना स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत दि.२४/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता अपर तहसीलदार व शेतजमीन न्यायाधिकरण माणगांव, जि.रायगड येथे स्वतः वकील अथवा प्रतिनिधीमार्फत न्यायाधिकरणापुढे हजर राहून बाजू मांडण्याविषयी याद्वारे फर्माविण्यात येत आहे.

जर कोणतीही व्यक्ती न्यायाधिकरणाची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून नेमलेल्या तारखेस व वेळी न्यायाधिकरणापुढे हजर राहण्यास कसूर करील तर त्या बाबीसंबंधी तीस काहीही सांगावयाचे नाही असे समजण्यात येईल व तिच्या गैर हजेरीत चौकशीचे काम पुढे चालवून न्यायाधिकरण योग्य तो आदेश पारीत करील, याची नोंद संबंधितांनी घ्यावी.

**अनुसूची**

| गावाचे नाव | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार |
|---|---|---|---|
| सालविंडे | ४७/१अ/१ | ८-०८-०० पैकी ०-४०-०० | ३.३४ |

ठिकाण : म्हसळा
दिनांक : १०/११/२०२१

**सही/-**
**अपर तहसीलदार व**
**शेतजमीन न्यायाधिकरण म्हसळा**

ॲड.अरविंद चामले

## जाहीर नोटीस

खालापूर येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो.खालापूर यांचे न्यायालयात
चौ.अर्ज नं.११८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०४/१२/२०२१

कै.किसन धर्मा निकाळजे
(मयत) तर्फे वारस
सौ.वासंती माधव गायकवाड
पुर्वाश्रमीची वासंती किसन निकाळजे
वय : ४१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.काजूवाडी खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
१) श्रीमती.रमाबाई किसन निकाळजे
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) रेश्मा किसन निकाळजे
वय : ३५ वर्षे, धंदा : गृहिणी
३) रुपाली किसन निकाळजे
वय : ३३ वर्षे, धंदा : गृहिणी
४) दुर्गा किसन निकाळजे
वय : ३० वर्षे, धंदा : गृहिणी
५) ज्योती किसन निकाळजे
वय : २५ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.वरोसेवाडी खोपोली, ता.खालापूर, जि.रायगड सामनेवाला

सदर जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, प्रस्तुत अर्जदार व सामनेवाला यांनी मे.कोर्टात चौकशी अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जदार क्र.१ वडील व सामनेवाला नं.१ चे पती व २ ते ५ यांचे वडील कै. किसन धर्मा निकाळजे हे दि.३१/०५/२०११ रोजी मु.वरोसे, पो.लोधिवली, ता.खालापूर, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून ते तेथील कायमचे रहिवासी होते. मृत्यूसमयी त्यांचे नावावर स्वकष्टार्जित खालीलप्रमाणे मिळकत होती व तिचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नढाळ, तालुका : खालापूर, जिल्हा : रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|
| १६५ | ३३ | ०-०१-८५ |
| १६५ | ३६ | ०-०१-८५ |

मयत कै.किसन धार्मा निकाळजे यांचे कायदेशीर वारसदार पुढीलप्रमाणे आहेत.

| क्रं. | वारसदाराचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | वासंती माधव गायकवाड | ४१ | मुलगी |
| २ | रमाबाई किसन निकाळजे | ५५ | द्वितीय पत्नी |
| ३ | रेश्मा किसन निकाळजे | ३५ | मुलगी |
| ४ | रुपाली किसन निकाळजे | ३३ | मुलगी |
| ५ | दुर्गा किसन निकाळजे | ३० | मुलगी |
| ६ | ज्योती किसन निकाळजे | २५ | मुलगी |

वरील प्रमाणे मयत कै.किसन धर्मा निकाळजे यांचे कायदेशीर वारसदार आहेत व यांचे शिवाय इतर कोणीही वारसदार नाहीत व नव्हते. प्रस्तुतचा चौकशी अर्ज हेअरशिप ठरवून मिळण्यासाठी मे.कोर्टात दाखल केला आहे. तरी या संदर्भात वारसा संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार हरकत वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबाबत लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : १०/११/२०२१
ठिकाण : खालापूर

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.खालापूर** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, खालापूर**

मा.गोडसे मॅडम

अर्जदार तर्फे वकील
कु.प्रगती रा. म्हात्रे
श्री.हरिश अ. म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.६०५/२०२१
नि.नं.१५/ड
ने.ता.१५/१२/२०२१

१) श्री.संदीप सुधाकर वेर्णेकर
वय : ४५ वर्षे, धंदा : सोनार
२) श्री.सचिन सुधाकर वेर्णेकर
वय : ४३ वर्षे, धंदा : सोनार
क्र.१ ते ३ रा.रो हाऊस नं.५,
समर्थ को.ऑ.सो., ठाणा नाका रोड,
एच.ओ.सी.कॉलनी जवळ, ता.पनवेल, जि.रायगड
३) सौ.श्रिया संतोष पावसकर
वय : ४७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.राधा निवास, इस्कॉन मंदिरा जवळ,
हाब्बू वाडा, कारवार, कर्नाटक-५८१३०६ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.सुधाकर गणपती वेर्णेकर यांचे वारस म्हणून वारसदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.सुधाकर गणपती वेर्णेकर हे दि.०८/११/२०१९ रोजी मु.सुरज हॉस्पिटल, सानपाडा, नवी मुंबई, येथे मयत झाले आहेत. कै.सुधाकर गणपती वेर्णेकर यांच्या नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | सदनिका क्र.४, अंजली को.ऑप.हौ. सोसायटी, सि.टी.एस.नं.७३२ ते ७३६, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ९२० चौ.फूट |
| २ | सदनिका क्र.३०१, तिसरा मजला, स्वर्णशिल्प सि.टी.एस.नं.१०३२, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | ४१० चौ.फूट कार्पेट+३६ चौ. फुट (एफ.बी.) |
| ३ | गाळा क्र.२, अंजली कॉम्प्लेक्स को.ऑ.हौ.सोसायटी, जोशी आळी, जुना पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | १७२.२ चौ. फुट कार्पेट |
| ४ | गाळा क्र.७, प्रजापती कॅस्केड, प्लॉट नं.७, सेक्टर-१, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड | २०१ चौ.फूट |
| ५ | मु.चिपळे, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं.७, हिस्सा नं.१ | ०.१२.५० गुंठे |

कै.सुधाकर गणपती वेर्णेकर यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नाव कमी करून वर वर्णन केलेल्या मिळकतीवर त्यांचे वारस अर्जदार क्र.१) श्री.संदीप सुधाकर वेर्णेकर, २) श्री.सचिन सुधाकर वेर्णेकर, ३) सौ.श्रिया संतोष पावसकर हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे रेकॉर्ड वर येणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे, सबब सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारसदाखला मिळणेकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.६०५/२०२१ दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१० नोव्हेंबर माहे सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

अर्जदारातर्फे वकील
सुजाता पलंगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.१५४०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/१२/२०२१

१) श्री.प्रसाद पुंडलिक धोंड
वय : ५३ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.बालाजी आंगण, ए विंग, बारावा मजला,
फ्लॅट नं.१२०५/१२०६, एस.टी.बस डेपो जवळ,
पनवेल, जि.रायगड-४१०२०६
२) गौरांगी व्यंकटेश गवाणकर
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.डी/३-४१, न्यू चंद्रा को.ऑप.हौ.लि.,
वीरा देसाई रोड, ऑफ लिंक रस्ता, आझाद
नगर, अंधेरी वेस्ट, मुंबई-४०००५३
३) श्री.पुंडलिक लक्ष्मण धोंड
वय : ९१ वर्षे, धंदा : काही नाही
रा.दुसरा मजला, आर.बी.धुरु वाडी,
३७२/अे वीर सावरकर मार्ग, दादर,
दादर वेस्ट, मुंबई-४०००२८ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

सर्व लोकांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, ज्याअर्थी अर्जदार क्र.१, २ हे कै.उषा पुंडलिक धोंड यांचे मुलगा व मुलगी आहेत व अर्जदार क्र.३ हे कै.उषा पुंडलिक धोंड यांचे पती आहेत. कै.उषा पुंडलिक धोंड ह्या दि.०३/०१/२०२० रोजी मुक्काम पनवेल येथे मयत झाल्या असून, त्या मु.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील रहिवासी होत्या.

कायद्यातील तरतुदीनुसार कै.उषा पुंडलिक धोंड यांचे अर्जदार क्र.१, २ व ३ हेच कायदेशीर वारस आहेत.

कै.उषा पुंडलिक धोंड ह्या हयात असताना त्यांचे नावे स्वकष्टार्जित, स्वतःच्या मालकीची जी काही जंगम स्वरुपाची मालमत्ता आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

**जंगल मालमत्ता तपशिल खालीलप्रमाणे :-**

अ) बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पनवेल मधील पी.पी.एफ. खात्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| | बँकेचे नाव | खाते क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा पनवेल | ४४९/९९-२००० नवीन नं.२०१२१६७३४३६ | रु.५,६२,८६९/- (सक्सेशन सर्टिफिकेटसाठी अर्ज दाखल करून त्याचा निकाल मिळेपर्यंतची व्याजासह होणारी रक्कम) |

ब) म्युच्युअल फंडमधील गुंतवणूकीचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशिल | फोलिओ नंबर | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | एच.डी.एफ.सी. इन्कम फंड | ५५४६४२९/९३ | १,११,७५७.५९ (अंदाजे रक्कम) |
| २ | एच.डी.एफ.सी. मिड कॅप अपॉरच्युनिटी फंड | ५५४६४२९/९३ | १,४०,६९१.७५ (अंदाजे रक्कम) |

वर वर्णन केलेली मिळकत कै.उषा पुंडलिक धोंड यांचे पश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार यांचे नावे होण्याकरिता आवश्यक ते सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून, या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

सबब, सदर मिळकतीबाबत कै.उषा पुंडलिक धोंड यांचे कायदेशीर वारस असल्याचे सक्सेशन सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्जदार यांनी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदरच्या सक्सेशन सर्टीफिकेटचे कामी कोणाच्याही कसल्याही हरकती असल्यास, सदरच्या हरकती ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलांमार्फत सादर कराव्यात. सदर नोटीशीच्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास ह्या अर्जदारांचे लाभात वारस दाखला (सक्सेशन सर्टीफिकेट) दिले जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्याानिशी आज दि.११/११/२०२१ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** | कोर्टाचा शिक्का | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## पनवेल तालुक्यातील साई येथून मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील साई गाव येथे उभी करून ठेवलेली एक मोटार सायकल अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना घडली आहे.

बाबुलाल देवासी (३४) यांनी भवानी हार्डवेअर समोरील मोकळ्या जागेत साई गाव या ठिकाणी ४० हजार रुपये किंमतीची हिरो कंपनीची काळ्या रंगाची सुपर स्प्लेंडर मोटार सायकल क्र.एमएच-४६-एडब्ल्यू-५४७६ ही त्या ठिकाणी उभी ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## मोटार वाहन निरीक्षकांचा माहे नोव्हेंबर महिन्याचा शिबीर कार्यक्रम जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण या कार्यालयामार्फत तालुकास्तरावर शिबीर कार्यालयाचे कामकाज प्रत्येक महिन्याला आयोजित करण्यात येत असते. कोविड काळातील दुसऱ्या लाटेत वाढती रुग्ण संख्या व शासनाच्या वेळोवेळीचे आदेशान्वये माहे मार्च २०२१ पासून शिबीर कार्यालयाचे कामकाज बंद ठेवण्यात आले. होते.

या शिबीर कार्यालयाचे कामकाज माहे नोव्हेंबर २०२१ पासून पूर्ववत करण्यात येत असून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,पेण कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षकांचा नोव्हेंबर-२०२१ महिन्याचा शिबीर कार्यक्रम पुढीलप्रमाणे-

सोमवार, दि.१५ व सोमवार, दि.२२ नोव्हेंबर २०२१ रोजी ता. महाड. मंगळवार, दि.१६ नोव्हेंबर २०२१ रोजी ता.मुरुड. बुधवार, दि.१७ नोव्हेंबर २०२१ रोजी रोहा. मंगळवार, दि.२३ नोव्हेंबर २०२१ रोजी ता.श्रीवर्धन. बुधवार, दि.२४ नोव्हेंबर २०२१ रोजी ता.माणगाव. शुक्रवार, दि.२६ नोव्हेंबर २०२१ व सोमवार दि.२९ नोव्हेंबर २०२१ रोजी ता.अलिबाग.


### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# कळंबोली ग्रामस्थांचा मालमत्ता कराविरोधात आक्रोश, सेवा नाही तर कर नाही

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

पनवेल महापालिकेने महापालिका क्षेत्रा-तील नागरिकांवर लादलेल्या मालमत्ता करा विरोधात गावातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. ग्रामपंचायतीपासून भरत असलेला जुना मालमत्ता कर व अन्य कर कळंबोली ग्रामस्थ भरत असताना वाढीव मालमत्ता कराच्या बाबत ग्रामस्थांना नोटिसा दिल्याने कळंबोलीतील ग्रामस्थ आता चांगलेच आक्रमक झाले आ-हेत. त्यांनी कळंबोलीतील कालभैरव मंदिर सभागृहांमध्ये ग्रामस्थांची बैठक घेऊन जोपर्यंत महापालिका पूर्णपणे नागरी सुविधा पुरवत नाही तोपर्यंत मालमत्ता कर भरायचा नाही असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या बैठकीला महिलांसह इतर शेकडो कळंबोलीतील ग्रामस्थ उपस्थित होते.



पनवेल महानगरपालिकेने कळंबोली गावा-तील नागरिकांना प्रॉपर्टी टॅक्स संदर्भात नोटीस दिल्याने नगरसेवक रविंद्र भगत, नगरसेवक गोपाळ शेठ भगत, नगरसेवक विजय खानावकर कळंबोली गावातील ग्रामस्थ व महिला मंडळ यांच्यासमवेत आज श्री काळभैरव मंदिर या ठिकाणी बैठक संपन्न झाली व सदर बैठकीत ग्रामस्थांनी टॅक्स ला विरोध करत सूचना करण्यात आल्या.

गेले साडेचार वर्षात जे ग्रामस्थ पनवेल महानगरपालिकेला टॅक्स भरत होते त्यास्वरुपात महानगरपालिकेकडून कोणतेही सुविधा महानगरपालिकेच्या माध्यमातून पुरविण्यात आलेली नाही.त्यामुळे कळंबोली गावातील सर्व ग्रामस्थांच्या एकजुटीने टॅक्स भरण्यास विरोध केला.यावेळी ग्रामस्थांकडून जोपर्यंत पनवेल महानगरपालिका पूर्ण पणे सुविधा देत नाही तोपर्यंत कोणीही कोणताही वाढीव टॅक्स भरायचा नाही असा निर्धार यावेळीकरण्यात आला. जर महापालिकेने याबाबत कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला तर ग्रामस्थांच्यावतीने महाविकास आघाडीच्या वतीने उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ग्रामस्थांच्यावतीने सांगण्यात आले. पनवेल महापालिकेने आकारलेल्या मालमत्ता करा विरोधात महापालिकेतील नगरसेवक रवींद्र भगत यांनी आमरण उपोषणाचा मार्ग अवलंबला होता. त्यावेळी महापालिकेच्यावतीने समन्वय साधून योग्य तो तोडगा काढला जाईल असे आश्वासन दिले होते. मात्र तरीही महापालिकेच्यावतीने कळंबोली ग्रामस्थांना पाठवण्यात आलेल्या नोटीस बाबत संताप व्यक्त करण्यात येत आहे. जो पर्यंत महापालिका सर्व नागरी सुविधा ग्रामस्थाना देत नाही तोपर्यंत मालमत्ता कर भरायचा नाही असे सर्वानुमते ठरविण्यात आले असल्याचे नगरसेवक रवींद्र भगत यांनी सांगितले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे खासगी वाहतूकदारांकडून प्रवाशांची लूट

### प्रवाशांकडून आकारत आहेत अधिक भाडे

**दै.रायगड नगरी । वाकण**

एस.टी. कर्मचाऱ्यांच्या संपाचा गैरफायदा उचलण्याचा खासगी वाहतूकदारांनी जणू काय चंगच बांधला आहे. त्याचा प्रत्यय सध्या विविध ठिकाणी प्रवास करणाऱ्या व अडलेल्या प्रवाशांना येत आहे. खासगी वाहतुकदार प्रवाशांकडून जवळजवळ दुप्पट व अवाच्या सवा भाडे घेत असल्याने या खासगी वाहतूकदारांची प्रवाशांकडून लूट सुरू आहे. त्यामुळे प्रवासी वर्गातून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य परिवहन मंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करावे या मुख्य मागणीसह अन्य काही मागण्यांसाठी एसटी महामंडळाच्या कामगार संघटनांनी राज्यभर संप पुकारला असल्यामुळे सर्व एसटी वाहतूक सेवा बंद आहेत. त्यामुळे खाजगी वाहतूकदार याचा गैरफायदा घेत असून याचा फटका सर्वसामान्य प्रवासी वर्गाला बसत आहे. खाजगी वाहतूकदार दामदुप्पट रक्कम आकारून प्रवास भाडे घेत असल्यामुळे अनेक नागरिकांना कामधंदे करण्यासाठी बाहेर गावी जाणे चांगेलच महाग पडत आहे. लांब पल्ल्याचा प्रवास करणाऱ्या प्रवासी वर्गाला तर फार मोठ्या प्रमाणात आर्थिक झळ सोसावि लागत आहे.

एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे ग्रामीण भागासह लांब पल्ल्याच्या वाहतुकीची घडी पूर्णपणे विस्कळीत झालेली आहे. या संपामुळे सर्वसामान्य प्रवासी वर्गाला नाहक जास्तीचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. आधीच कोरोना महामारीच्या संकटात सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असताना आता एसटी कर्मचाऱ्यांच्या संपामुळे जनता अधिकच बेजार झाली आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांना व गावो-गावी फिरून व्यवसाय करणाऱ्या लहान व्यावसायिकांना सध्या खासगी प्रवासी वाहनाने प्रवास करणे परवडत देखील नाही.

काम नाही केल्यास खायचे काय ? असा गहन प्रश्न निर्माण झालेला आहे. महत्वाच्या कामासाठी बाहेर गावी जाणे गरजेचे असल्यामुळे नाईलाजास्तव प्रवासी वर्गाला तीन ते चार पट प्रवास भाडे द्यावे लागत असून शासनाने यावर लवकरात लवकर योग्य तो तोडगा काढून प्रवासी वर्गाला दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

# तोतया पोलिसाने लुबाडले ज्येष्ठ नागरिकाचे दागिने

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पोलीस असल्याचे भासवून एका लुटारुने आणि त्याच्या साथीदाराने भररस्त्यात एका ज्येष्ठ नागरिकाला अडवून त्याच्या जवळचे सुमारे दिड लाख रुपये किंमतीचे दागिने हातचलाखीने लुबाडून नेल्याची घटना पनवेल शिळ मार्गावर किरवली येथे घडली. तळोजा पोलिसांनी या प्रकरणी तोतया पोलिसासह दुक्कली विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणात लुबाडण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव राजकुमार प्रजापती (६७) असे असून ते कळंबोली, सेक्टर-१ई मध्ये राहण्यास आहेत. प्रजापती यांची विवाहित मुलगी कल्याण येथे राहण्यास असल्याने ते स्कुटीवरुन कल्याण येथे जात होते. शिळफाटा टोल नाकाच्या पुढे पनवेल-शिळ हायवेवरील किरवली गावाजवळ त्यांच्या पाठीमागून ॲक्टीव्हा स्कुटीवरुन आलेल्या एका तोतया पोलिसाने ओव्हरटेक करुन त्यांना अडवले. त्यानंतर त्याने प्रजा-पती यांना पोलीस खात्याचे चिन्ह असलेले ओळखपत्र दाखवून स्कुटी बाजुला घेण्यास सांगितले.

त्यानंतर तोतया पोलिसाने प्रजापती यांना बोलण्यात गुंतवून त्यांच्या हातातील घड्याळ, सोन्याचे ब्रेसलेट, चेन, अंगठी, लॉकेट या सर्व वस्तू रुमालात बांधून देण्याच्या बहाण्याने आपल्याकडे घेतल्या. त्यानंतर त्याने प्रजापती यांचे सर्व दागिने हातचलाखीने काढून घेत घड्याळ आणि मनीपर्स असलेले रुमाल देऊन साथीदारासह पलायन केले.

प्रजापती स्कुटीवरुन काही अंतर पुढे गेल्यानंतर त्यांना संशय आल्याने त्यांनी स्कुटीच्या डिकीमध्ये रुमाल तपासला असता त्यात बांधुन ठेवलेले दागिने नसल्याचे आढळून आले. अखेर आपली फसवणुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर प्रजापती यांनी तळोजा पोलीस ठाणे गाठून तक्रार केली.

# उरण ते शिर्डी पदयात्रा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील उरण नगर परिषद हद्दीतील श्रद्धा सबुरी पदयात्रा मंडळ उरण (बोरी) यांच्या वतीने बुधवार (दि.१०) रोजी सकाळी ६ वाजता श्री साई मंदिर उरण (बोरी - पाखाडी) ते श्री क्षेत्र शिर्डी पालखी पदयात्रा निघाली. यंदाचे पालखीचे हे ८ वे वर्ष आहे.

पदयात्रा बुधवार (दि.१०) ते बुधवार (दि.१७) नोव्हेंबर या कालावधीत असणार आहे. पदयात्रेला बुधवार ( दि. १० )रोजी सकाळी ६ वाजता श्री साई मंदिर उरण (बोरी- पखाडी) सुरुवात झाली. पुढे वैष्णवी हॉटेल, स्वामी विवेकानंद चौक, देऊळवाडी (शंकर मंदिर), गणपती चौक, राजपाल नाका, कोट नाका, राघोबा देव मंदिर येथे अल्पोपहार करून पुढे नवीमुंबई हून शिर्डी येथे रवाना झाली.

धनंजय भोरे, दिपक थळी, सुरेश अय्यर (अण्णा), हरिराम शर्मा, सुयोग ठाकूर, राजेश पुरव, सिद्धार्थ म्हात्रे, सिद्धार्थ सुर्वे, रोहन पारधी, हंसराज चव्हाण, प्रशांत शिरधनकर, प्रलय तारेकर, ओमकार राऊत, मयुरेश पाटील, विशाल जाधव, भूषण पाटील, मयुरेश सदशियन, चेतन माळी, गणेश तांडेल, जयेश म्हात्रे आदी साई भक्त या पदयात्रा सोहळा मध्ये सहभागी झाले आहेत.

# फुटपाथवर व्यवसाय करणाऱ्या टपरीधारक यांच्याकडून कर वसुली करणार



**दै.रायगड नगरी । कर्जत**

नेरळ गावातील बहुतेक रस्त्यांवर अतिक्रमण करून व्यवसाय केले जात आहेत. त्या व्यवसाय करणाऱ्या टपरी धारक यांच्याकडून आता नेरळ ग्रामपंचायत कर वसूल करणार आहे. दिवंगत सरपंच रावजी शिंगवा यांनी रस्त्यावर बसून व्यवसाय करणाऱ्या दुकानदार यांच्याकडून कर वसूल करण्याचा ठराव घेतला होता. दरम्यान, नेरळ ग्रामपंचायतची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आता रस्त्यावर तसेच फुटपाथवर बसून व्यवसाय करणाऱ्या दुकानदार करणाऱ्यांकडून कर वसूल करण्याचा निर्णय घेतला आहे.

नेरळ गावातील मुख्य बाजारपेठ असलेल्या स्टेशन रोड रस्त्याचा एक भाग फेरीवाला यांनी व्यापला आहे. त्याचवेळी नेरळ गणेश घाट परिसरातील रस्ते देखील फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. त्यात नेरळ स्टेशन भागातील रस्त्यावर किमान १०० फेरीवाले यांनी रस्त्याचा फुटपाथ व्यापला आहे. त्या व्यवसायिक यांच्याकडून नेरळ ग्रामपंचायत कोणत्याही प्रकारचे कर आकारत नाही. त्यामुळे ते सर्व फेरीवाले बिनदिक्तपणे व्यवसाय करीत असून त्यांच्यावर कोणाचाही दबाव नाही. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायत तत्कालीन दिवंगत सरपंच रावजी शिंगवा यांचे कार्यकाळात ग्रामपंचायतचे आर्थिक उत्पन्न वाढीसाठी गणेश घाट रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या दुकानदार यांच्याकडून दैनंदिन कर वसूल करण्याचा ठराव घेतला होता. त्या ठरावाची अंमलबजावणी नेरळ ग्रामपंचायत कडून करण्यात आली नव्हती आणि त्यामुळे तो ठराव तीन महिन्यात कारवाई केली नाही म्हणून आताच्या सदस्य मंडळाने आता त्या ठरावात बदल केला आहे.

नेरळ ग्रामपंचायतने आता केवळ गणेश घाट परिसरात नाही तर नेरळ बाजारपेठ भागात रस्त्यावर आणि फुटपाथ वर बसून व्यवसाय करणाऱ्या सर्वांकडून कर वसूल करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती ग्राम विकास अधिकारी गणेश गायकर यांनी दिले आहेत. त्या ठरावानुसार ग्रामपन्चायत आपली आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि कर्मचारी वर्गाचे पगार यांच्यासाठी अतिक्रित पैशाची असलेली गरज लक्षात घेऊन दुरुस्ती करून घेण्यात आलेल्या ठरावाची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यामुळे आता गेली अनेक वर्षे ग्रामपंचायतला एक रुपयाचा कर न भरणाऱ्या फुटपाथ वर व्यवसाय करणारे यांच्याकडून कर स्वरूपात दैनंदिन कर वसूल करण्याची कार्यवाही केली जाणार आहे.

# राहत्या घरातून मोबाईलसह रोख रक्कम लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून अज्ञात चोरट्याने रोख रक्कमेसह मोबाईल चोरुन नेल्याची घटना साई येथे घडली आहे.



या ठिकाणी राहणारे हिमांशु बाबर खान (२१) यांच्या रुमचा दरवाजा दोरीने बांधून ते झोपले असताना अज्ञात चोरट्याने दरवाजाची दोरी कशानेतरी तोडून दरवाजावाटे आत प्रवेश करून तेथे असलेला ५ हजार रुपये किंमतीचा काळ्या रंगाचा मोबाईल फोन व एक हजार रुपये रोख रक्कम लंपास केल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पाडव्यानिमित्त ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्राला प्रितम म्हात्रे यांच्याकडून वॉटर प्युरिफायर भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा कॉलनी सेक्टर ६ येथील लोकमाता अहिल्यादेवी होळकर उद्यानातील अमोल जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात जेष्ठ नागरिकांना शुद्ध पाणी पिण्यासाठी जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेमार्फत ऍक्वागार्ड बसविण्यात आले.



भारतीय धनगर परिषद खांदा कॉलनी यांनी प्रितम म्हात्रे यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार जे एम म्हात्रे चॅरीटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे यांनी संस्थेच्या वतीने तत्काळ RO वॉटर प्युरिफायर बसवून दिले. याचे उद्घघाटन करण्यात आले.

वेळोवेळी मागणी करूनही कोणीही लक्ष दिले नाही परंतु सदर विषय आम्ही विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांना सांगितल्यावर त्यांनी त्वरित सहकार्य केले. त्याबद्दल भारतीय धनगर परिषदे च्या पदाधिकाऱ्यांनी प्रीतम दादांचे आभार मानले. यापुढेही कोणत्याही प्रकारचे आपणास सहकार्य लागल्यास शेतकरी कामगार पक्ष, खांदा कॉलनी आपल्या सोबत आहे असे प्रितम म्हात्रे यांनी तेथील उपस्थित स्थानिक ज्येष्ठ नागरिक आणि रहिवासीयांना आश्वासन दिले.

यावेळी विरोधी पक्ष नेते प्रितम जनार्दन म्हात्रे, माजी नगराध्यक्ष गणेश पाटील, मा.नगरसेवक शिवाजी थोरवे, विजय काळे, कामगार नेते महादेव वाघमारे, अनील बंडगर, ॲड.किरण घरत, शिवाजी शिलकर, महेंद्र कांबळे, सागर भडांगे, श्याम लगाडे, संतोष सावंत, अनंत म्हात्रे, मंगेश अपराज, किरण गावंड, अश्विनी जोगदंड, पेडणेकर, जानकर महेश राऊत, महेश वलकुंडे, भाऊसाहेब लबडे आदी उपस्थित होते.

# लसवंत व्हा नाहीतर कठोर कारवाई करणार : तहसीलदार समीर घारे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

देशात आणि राज्यात आजूनही कोरोना प्रादुर्भाव कमी झालेला नाही. कोरोनाला कायमस्वरुपी संपुष्टात आणण्यासाठी १००% लसीकरण करून घेणे गरजेचे आहे. गेले वर्षभर केंद्र व राज्य शासन जनतेला लसीकरणाचे दोन डोस घेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करून हि जनतेचा पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही.



आता ही शेवटची संधी आसुन ३० नोव्हेंबर पर्यंत सर्वांनी लसवंत व्हा असे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांनी राज्यातील जनतेला सांगितले आहे. डोस न घेतल्यास स्थानिक पातळीवर कारवाईला सामोरे जा असा सुचक इशारा दिला आहे. म्ह-सळा तालुका तहसीलदार समीर घारे यांनी त्यांचे कार्यालयात तालुक्यातील धान्य दुकानदार, रास्त भाव धान्य व केरोसीन विक्रेते, हॉटेल संघटना, टपरी धारक, फेरीवाले, आटो रिक्षा, मिनोडोअर संघटना, गॅस विक्रेते, शिवभोजन केंद्र आणि विविध प्रकारच्या स्वयंसेवी संस्थांची मिटिंग घेऊन त्यांचे सहकार्याने येत्या १० दिवसांत नागरिकांना लसवंत व्हावे अन्यथा महसुल, पोलीस आणि नगरपंचायत प्रशासनाचे मदतीने वेगवेगळ्या प्रकारच्या शासन कारवाईना सामोरे जावे लागेल असा सुचक इशारा देण्यात आला आहे.

कोविड -१९ लसीकरण सर्वच नागरिकांनी घेणे बाबत जिल्हा पुरवठा अधिकारी अलिबाग रायगड यांचे कडील पत्र क्रं. पुशा/ कात-५/ शि.धारक कोविड -१९ लसीकरण/२०२१/३५३३ अशा प्रकारे पत्र तहसीलदार यांना पाठवले आहे त्या अनुषंगाने म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी आयोजित केलेल्या मिटींगला निवासी नायब तहसिलदार के. टी. भिंगारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत गायकवाड, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष नंदू सावंत, रिक्षा युनियन अध्यक्ष रियाज घराडे, मेडिकल असोसिएशनचे मोहीत मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.